


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६९९. वा | मंगळवार | दि.०५ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये




# रोखपाल लाकडे यांच्या कार्यकाळातही भ्रष्टाचाराला आले उधाण

## जिल्हा सामान्य रुग्णालयात कोट्यवधींची वाढीव बिले होताहेत मंजूर...

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचार हा अंतहीन आहे की काय, अशी शंका आता येऊ लागली आहे. कारण या ठिकाणी अधिकारी बदलतात, चेहरे बदलतात, प्रशासनात बदल होतात. हे सगळे होत असताना एकच गोष्ट बदलत नाही ती म्हणजे जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार. तत्कालीन रोखपाल पी. के. माळी यांच्या कार्यकाळात सुरू झालेली भ्रष्टाचाराची उच्च कोटीची परंपरा विद्यमान रोखपाल आर.एस.लाकडे यांनीही सुरूच ठेवल्याचे दिसून येत आहे. परंतु याकडे ना अधिकाऱ्यांचे लक्ष आहे ना लोकप्रतिनिधींचे. जिल्हा रुग्णालयात राजरोसपणे चालणाऱ्या भ्रष्टाचारावर सर्वप्रथम भाष्य करणाऱ्या सिटी न्यूज व दैनिक जनसचंलनने हा भ्रष्टाचार जनतेसमोर आजवर स्पष्टपणे उघड केला आहे. या भ्रष्टाचाराची व्याप्ती आता एव्हढी आहे की, यामध्ये जिल्हा रुग्णालयात कार्यरत विद्यमान अधिकारी असो की, पूर्वाश्रमीचे जिल्हा शल्यचिकित्सक वा इतर अधिकारी असोत.अनेकांनी या भ्रष्टयाचाराच्या नाल्यात आपले हात धुवून घाण केलेले आहेत. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनने यापूर्वीच खुलासा केल्याप्रमाणे जिल्हा रुग्णालयातील तत्कालीन रोखपाल पी. के. माळी हे भ्रष्टाचाराचे शिरोमणी होते. माळी यांनी आपल्या कार्यकाळात भ्रष्टाचाराचे अनेक विक्रम प्रस्थापित केलेले आहेत. त्यांच्या कार्यकाळात बेकायदेशीररित्या अव्वाच्या सव्वा बिले अदा

**पोस्टमार्टम ७०**

करण्यात आली. यातून कोट्यवधी रुपयांचा घोटाळा करण्यात आला. या संपूर्ण प्रक्रियेत जिल्हा रुग्णालयात यापूर्वी येऊन गेलेले जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रेमचंद पंडित व डॉ. नितीन तडस हे देखील सामिल होते. त्यांच्याही कार्यकाळात या पी. के. माळी नावाच्या महाभ्रष्टाचारी महाठगाला कोणीही रोखण्याची तसदी घेतली नाही. त्यानंतर पी. के. माळी हे सेवानिवृत्त झाले आणि हा महाभ्रष्टाचारी अधिकारी जिल्हा रुग्णालयाला भ्रष्टाचाराची कीड लावून आज नामानिराळा झाला आहे. पी.के.माळी यांनी आर.एस.लाकडे यांच्याकडे प्रभार देताना अनेक घोळ करून ठेवले. रोखपाल आर एस लाकडे यांच्याकडे पूर्णपणे प्रभार कधीही देण्यात आला नाही. परंतु लाकडे यांनी माळी यांच्या भ्रष्टाचाराचा बारकाईने अभ्यास केला असावा. त्यामुळेच की काय, लाकडे यांनी आहे तसाच प्रभार घेतला. आज त्यांच्याकडे खरे तर अनेक प्रकारचे व्यवहार पूर्ण करण्याचे अधिकार नाही. तरीही ते बेकायदेशीररित्या रोखपालपदाचा कारभार हाकत आहेत. माळी यांच्या भ्रष्टाचाराचा कित्ता लाकडे हे विनासायास गिरवत आहेत. लाकडे हे वरतून स्वतःला अत्यंत निष्पाप


**जिल्हा सामान्य रुग्णालयातील भ्रष्टचाराची कीड ( रोग ) चे आम्ही पूर्ण उपचार करीत नाही तो पर्यंत आमचे पोस्टमार्टम सत्र असेच सुरू राहणार**

व साळसूद दाखवण्याचा प्रयत्न करतात.परंतु लाकडे यांच्यासारखा बदमाश आणि आतल्या गाठीचा माणूस शोधून सापडायचा नाही. कारण लाकडे हे देखील राजरोसपणे भ्रष्टाचार करीत आहेत. कोट्यवधींची बिले त्यांच्या माध्यमातून अदा केली जात आहेत. हे सर्वकाही होत असताना यात निश्चितच जिल्हा रुग्णालयातील विद्यमान अधिकारी देखील तेव्हढेच दोषी आहेत. कारण त्यांच्या डोळ्यादेखत भ्रष्टाचार आणि अनेक नियमबाह्य कामे होताना दिसत असतानासुद्धा ते यासंदर्भात काहीही कारवाई करीत नसल्याने या सर्व भ्रष्टाचारात एक तर ते स्वतः तरी सामिल असावेत किंवा ते जाणुनबुजून आणि अर्थपूर्ण या भ्रष्टाचाराकडे कानाडोळा करीत आहेत. पी. के. माळी यांच्या संदर्भात अनेक वदंता जिल्हा रुग्णालयात आहेत. त्यांनी कशाप्रकारे आपल्या वरिष्ठांना आपल्या भ्रष्टाचारात सामिल करून घेतले नंतर आपल्याच अधिकाऱ्यांना त्यांनी विविध मार्गांनी ब्लॅकमेल केले व आपल्या संपूर्ण कार्यभाग साधून घेतला, अशाप्रकारच्या चर्चा आहेत. यातील सत्यता सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन येत्या काळात शोधून काढणार आहेच, यात काही शंका नाही.परंतु या संपूर्ण प्रकारामुळे जिल्हा रुग्णालयाती भ्रष्टाचाराला कुठेही अंत नाही, असे दिसून येत आहे. अधिकारी बदलला किंवा प्रशासनात काही बदल




झाले तरी भ्रष्टाचाराची परंपरा कायमच आहे. लाकडे यांच्याविषयी देखील अनेक चर्चा कानावर पडत असतात. त्याची शहानिशा येत्या काळात केली जाणार आहे. कारण भ्रष्टाचार ही लोकशाहीला पोखरणारी वाळवी आहे. त्यामुळे या वाळवीचा कायमस्वरूपी बंदोबस्त करणे गरजेचे आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनची बांधिलकी ही या देशाच्या लोकांप्रति आहे. लोकांमुळेच लोकशाही देखील टिकून आहे. त्यामुळे लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून जनतेच्या हिताच्या दृष्टीने काम करणे हे दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजचे प्रथम कर्तव्य आहे. हेच कर्तव्य पार पाडण्याचे काम आम्ही करीत आहोत आणि करीत राहणार. परंतु जोपर्यंत जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाऱ्यांचे बुरखे जगासमोर आणून टराटरा फाडुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जात नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज कधीही शांत बसणार नाही.

अजून बरेच काही पुढील भागात...




# वृद्ध महिलेची आर्थिक फसवणूक, पिता,पुत्रावर गुन्हा

**जनसंचलन/ साखरखेर्डा**

बेसहारा वृद्ध महिलेची आर्थिक फसवणूक, अश्लील व जातिवाचक शिवीगाळ आणि विनयभंग करून जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी साखरखेर्डा पोलिसांनी मलकापूर पांग्रा येथील दोन आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत. मलकापूर पांग्रा येथील साबेरखा सुलतानखा पठाण व जावेदखा साबेरखा पठाण अशी याप्रकरणातील आरोपींची नावे आहेत. प्रकरणातील पीडित ७० वर्षीय महिलेने याप्रकरणी तक्रार दिली होती. ६ नोव्हेंबर २०२३ ते १६ फेब्रुवारी २०२४ दरम्यानची ही घटना होती. याप्रकरणी पोलिसांनी ३ मार्च रोजी पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे. साबेरखा याने पीडित महिलेकडून साक्षीदार समाधान राधाकिसन सोनुने याच्या नावे एक एकर ९ गुंठे शेती खरेदी खत करून घेत समाधान सोनने याच्याकडून ४ लाखांचा धनादेश स्वतः सह मुलगा जावेद खा यांच्या नावे घेत वटविला होता. तक्रारकर्त्या महिलेस पैसे न देता पीडिता व साक्षीदार यांची साडेतीन लाख रुपयांनी फसवणूक केली. पीडिता तथा तक्रारदार महिला ही बेसहारा असून तिच्या पतीचे निधन झालेले आहे. मुलबाळ होत नसल्याने आरोपींनी तिच्या एकटेपणाचा गैरफायदा घेत अश्लील व जातिवाचक शिवीगाळ करून जिवे मारल्याची



धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. त्यावरून ठाणेदार स्वप्निल नाईक यांनी आर्थिक फसवणूक, धमकी, जातीवाचक शिवीगाळ यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास मेहकरचे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील हे करीत आहेत. आरोपी एका राजकीय पक्षाचा पदाधिकारी आहे.

# पुढाऱ्यांच्या शेतकऱ्यांबद्दलचा कळवळा केवळ दिखावा - संदीप शेळके...

## वन बुलडाणा मिशनच्या परिवर्तन रथयात्रेला खामगाव तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद...

जनसंचलन/ खामगाव

शेतकऱ्यांवर ओढावलेले अस्मानी संकट पुढाऱ्यांना दिसत नाही. अतिवृष्टी झाली, नुकसान झालं त्यावेळी शेतकऱ्याच्या बांधावर पोहोचून केवळ घोषणा करणे एवढंच त्यांना कळते. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांप्रती पुढारी दाखवत असलेला कळवळा हा केवळ दिखावा असल्याचा घणाघात वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी केला.

वन बुलडाणा मिशनची परिवर्तन रथयात्रा सध्या खामगाव तालुक्यात असून ४ मार्च रोजी गारडगाव येथे झालेल्या सभेत संदीप शेळके बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, लोकशाहीने आम्हाला मतदानाचा अधिकार दिला. आमच्या गल्लीचा, गावाचा विचार दिल्लीत व्हावा असे आम्हाला वाटले पण दिल्लीत जाऊन लोकप्रतिनिधींनी त्यांचाच विचार केला. राजकारणाला जनकल्याणाचे साधन मानण्याऐवजी स्वतःच्या स्वार्थाचे साधन मानणाऱ्या लोकप्रतिनिधींना जनता आता धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही. कारण आता जनतेच्या संयमाचा बांध सुटला आहे. खामगाव, शेगाव परिसर रेल्वेने जोडलेला आहे. मात्र असे असले तरी येथे पाहिजे त्या प्रमाणात औद्योगिक विकास झाला नाही. खामगाव, शेगावचा तरुण पुण्या - मुंबईत रोजगारासाठी कंपनीचे उंबरठे झिजवतो तेव्हा आम्हाला आमच्या लोकप्रतिनिधींची लाज वाटते. इथे आम्ही तरुणांना रोजगार उपलब्ध करून देऊ शकलो नाही, ही शोकांतिका नाही का? असा सवाल वन बुलडाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी उपस्थित केला. आपल्या भाषणातून सत्ताधाऱ्यांवर टीकेचा आसूड उगारताना संदीप शेळके म्हणाले की, आजवर जिल्ह्यातील नेत्यांना घाटाखालच्या जनतेने खूप प्रेम दिलं. पण नेत्यांनी त्यांची फसवणूक केली आहे. रस्त्यांचे बांधकाम, नाल्यांचे बांधकाम अशी ग्रामपंचायत स्तरावर झालेली कामे सांगून आपण मोठा विकास केला असल्याचे नेते अभिमानानं सांगतात. मुळात जिल्ह्यातील नेत्यांना आजवर विकास म्हणजे काय हेच कळाले नाही. मातृतीर्थ बुलडाणा जिल्ह्याला गौरवशाली वारसा लाभला असतानाही पर्यटनाच्या दृष्टीने, रोजगाराच्या दृष्टीने सत्ताधाऱ्यांनी आजवर विचार केला नाही, असेही संदीप शेळके म्हणाले.आता शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी वन बुलडाणा मिशनने पुढाकार घेतला आहे. जनतेने जर संधी दिली तर प्रत्येकाच्या शेताच्या बांधावर पाणी आणि तालुक्याला एमआयडीसी आणल्याशिवाय राहणार नाही, असा आशावाद संदीप शेळके यांनी बोलून दाखविला. आता येणारी लोकसभा निवडणूक जिल्ह्याचा भाग्योदय घडवणारी असणार आहे. राजकारणाला मिशन समजून आपण काम करत असून जनतेने संधी दिल्यास खासदार म्हणून नव्हे तर लोकसेवक म्हणून काम करणार असल्याचा निर्धार यावेळी शेळके यांनी बोलून दाखवला. खामगाव तालुक्यात अनेक समस्या आहेत. खामगाव रेल्वेशी जोडलेले असून देखील इथे पाहिजे, त्या प्रमाणात आद्योगिक विकास



झाला नाही, एवढं सगळ असताना इथल्या तरुणांना जर पुण्या मुंबईत नोकरी शोधावी लागत असेल तर ही शोकांतिका नाही का? असा सवाल शेळके यांनी उपस्थित केला. आता आपला विकास आपल्या हाती आहे. जिल्ह्यात परिवर्तनाच्या माध्यमातून विकासाची गंगा आणायची आहे, नदीजोड प्रकल्प, प्रत्येक तालुक्यात एमआयडीसी, उच्च दर्जाचे शिक्षण, महिला सक्षमीकरण, सिंचनाची सोय या गोष्टी आपल्या अजेंड्यावर असल्याचे संदीप शेळके म्हणाले. वन बुलडाणा मिशनच्या परिवर्तन रथयात्रेला खामगाव तालुक्यात जोरदार प्रतिसाद मिळत आहे. खामगावात झालेला महिला मेळावा अभूतपूर्व ठरला होता. त्यानंतर ४ मार्चला सकाळी गारडगाव, हिवरखेड, लोखंडा, घारोड, लाखनवाडा, शिरला, आंबेटाकळी, अटाळी, विहिगाव, रामनगर या गावांत परिवर्तन रथयात्रेचे दमदार स्वागत झाले. यावेळी झालेल्या दमदार सभा परिवर्तनाचे संकेत देणाऱ्या ठरल्या.

# कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांचे एक वर्षापासून वेतन रखडले

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा सामान्य रुग्णालयातील कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांचे वेतन जवळपास एक वर्षापासून करण्यात न आल्याने त्रस्त झालेल्या या कर्मचाऱ्यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात ४ मार्च रोजी आंदोलन केले. रुग्णवाहिका चालक, कक्ष सेवक तथा सुरक्षा रक्षकांचा यामध्ये समावेश होता. जिल्हा शल्यचिकित्सकांच्या कक्षात हे आंदोलन कगागान भाले शेख रफीक यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. जळगाव खान्देश, नागपूर आणि बुलढाणा येथील एजन्सी अंतर्गत हे जवळपास १२० कंत्राटी कर्मचारी कार्यरत होते. गेल्या ८ ते १२ महिन्यांपासून ते कंत्राटी तत्वावर सेवा देत आहे. मात्र त्यांना वेळेत वेतन मिळाले नाही. त्यामुळे नियमित वेतन देण्यात यावे, यासंदर्भाने काहींनी न्यायालयातही प्रकरण दाखल केले आहे. त्यानंतरही नाही. त्यामुळे जिल्हा शल्यचिकित्सकांच्या कक्षात या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी ठिय्या आंदोलन करत जोरदार घोषणाबाजी केली. या आंदोलनामध्ये रणजित खिल्लारे, गजानन मुंढे, वैशाली जाधव, सुरज लहासे, प्रदीप सोळंके यांच्यासह अन्य सहभागी झाले होते. यापूर्वीही या कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांनी वेतन प्रश्नी यंत्रणेकडे पाठपुरावा केला होता. मात्र वेतनाचा भगा या कर्मचाऱ्यांना वेतन मिळालेले ११७ निकाली निघाला नव्हता

# किरकोळ वादातून दोन गटांत तणाव

## चिखली पोलिस स्टेशनमध्ये आला होता जमाव : ४ जणांवर गुन्हे दाखल




जनसंचलन/ चिखली

घरासमोरून बेदरकारपणे बुलेट चालविण्यासह बुलेटमधून कर्णकर्कश फटाक्यांचा आवाज काढण्यावरून चिखलीतील राऊतवाडी परिसरात ३ मार्चच्या रात्री दोन गटांत तणाव निर्माण झाला होता. या घटनेनंतर चिखली पोलिस स्टेशनसमोर मोठा जमाव जमा झाला होता. दरम्यान, या प्रकरणी चार जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. स्थानिक राऊतवाडी चौकातून रात्री पावणेबाराच्या सुमारास बुलेटवरून भरधाव वेगाने व बुलेटच्या सायलेन्सरमधून फटाके वाजवित जाणाऱ्या दानीयल अली खान यास या भागातील गोटू बोराडे, पवन घोरपडे व छोटू खलसे या तिघांनी बुलढाणा रोडवरील एका पेट्रोल पंपावर गाठून जाब विचारला होता. यावरून या ठिकाणी बाचाबाची झाली होती. दरम्यान, याच कारणावरून पुन्हा राऊतवाडी चौकात दोन गटांत बाचाबाची झाली. यामुळे येथे तणाव निर्माण झाला होता. पोलिसांनी मध्यस्थी करीत हा जमाव पांगविल्याने तणाव निवळला. दरम्यान, ४ मार्च रोजी या प्रकरणी मो. तोहफीक मो. रफीक (२८) याने चिखली पोलिसांत तक्रार दाखल केली. यामध्ये मो. तोहफीक व जुबेर अली खान हे दोघे जण बुलढाण्याहून चिखलीकडे येत असताना त्यांना दानीयल अली खान हा पेट्रोल पंपावर भेटला असता त्याने राऊतवाडी चौकातून बुलेट जोरात का चालविली म्हणून तिघांनी बाचाबाची केल्याचे सांगितले. त्यास घरी पाठवून तोहफीक व जुबेर हो दोघे जण स्कूटीवरून राऊतवाडी चौकातून घराकडे निघाले असता चौकात उभे असलेल्या गोट्या बोराडे, पवन घोरपडे, छोटू खलसे व एका अनोळखी व्यक्तीने चालत्या गाडीवर अचानकपणे हल्ला चढवून मारहाण केली होते. या प्रकरणी गोट्या बोराडे, पवन घोरपडे, छोटू खलसे व एका अनोळखीवर गुन्हा दाखल केला आहे.

# कामगार कल्याण मंडळाच्या स्पर्धेत बुलढाण्याच्या कलावंतांची ऐतिहासिक कामगिरी

जनसंचलन/बुलडाणा

येथील नाट्यसृष्टीसाठी आजचा दिवस ऐतिहासिक ठरला. महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळाच्या ६९ व्या नाट्यस्पर्धेत येथील कलावंतांनी कामगार कल्याण केंद्र चिखलीकडून सादर केलेल्या ङ्खअनपेक्षितङ्ख या दोन अंकी नाटकाने एकूण सहा बक्षिसांसह राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. बुलढाणाच्या नाट्य इतिहासात शासनाच्या स्पर्धेत राज्यस्तरीय विजेतेपद मिळविण्याची ही पहिलीच घटना आहे.

महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळाच्यावतीने आज ४ मार्च रोजी संध्याकाळी स्पर्धेचा निकाल जाहिर करण्यात आला. नाशिक येथील परशुराम साईखेडकर नाट्यगृहात ८ ते २५ फेब्रुवारी दरम्यान ही स्पर्धा पार पडली. राज्याच्या विविध केंद्रांवर प्राथमिक फेरीत विजेत्या ठरलेल्या एकूण १८ नाट्यसंघांनी आपले प्रयोग सादर केले. यामध्ये अकोला विभागातून प्रथम आलेल्या कामगार कल्याण केंद्र चिखलीतर्फे स्थानिक कलावंतांनी शैलेंद्र टिकारीया लिखित व विजय सोनोने दिग्दर्शित अनपेक्षित हे दोन अंकी नाटक २४ फेब्रुवारी रोजी सादर केले. आज जाहीर झालेल्या निकालात टीम अनपेक्षितला एकूण सहा बक्षिसे प्राप्त झाली व राज्यातून प्रथम येण्याचा बहुमान प्राप्त झाला. बक्षिसांमध्ये टीम अनपेक्षितला सांघिक - प्रथम, विजय सोनोने यांना दिग्दर्शन - प्रथम, विराग जाखड यांना प्रकाशयोजना प्रथम, अनिकेत गायकवाड यांना नेपथ्य प्रथम, विजय सोनोने यांना संगीत प्रथम, धनंजय बोरकर यांना उत्तेजनार्थ अभिनय द्वितीय यांचा समावेश आहे. नाट्यसंघात कलावंत म्हणून पराग काचकुरे, पंजाबराव आखाडे, डॉ. स्वप्नील दांदडे, प्रसाद दामले, कल्याणी काळे यांचा समावेश होता. नाट्यसंघाला गणेश देशमुख, लक्ष्मीकांत गोंदकर, अर्चना जाधव, पवन इंगळे, यांनी सहकार्य केले. कामगार कल्याण केंद्र चिखलीचे समन्वयक अनंता मोरे, अमरावती कामगार कल्याण अधिकारी वैशाली नवघरे यांनी विशेष सहकार्य केले.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# गजानन महाराज प्रकट दिनी, डॉ मृणाल निकमला गजरत्न पुरस्कार

**जनसंचलन/बुलढाणा**

श्री रत्नाकर व सरला राजनकरांच्या पुढाकाराने गजानन महाराज मंदिर सरस्वती नगर बुलढाणा वतीने ३६ वा गजानन महाराज प्रकट दिनी श्री रत्नाकर राजनकर स्मृतीप्रित्यर्थ दुसरा गजरत्न पुरस्कार डॉ मृणाल मदन निकमला देण्यात आला. अगदी पहील्या वर्गापासून मृणाल वर्गात प्रथम येत असून तिने १० वित एडेड शाळेत प्रथम, येऊन १५वी मेरिट आली होती, तिच्या स्वप्नांना भरारी देण्याकरता निकम कुटुंबाने तिला कोट्याला पाठवले. मृणाल ने तिथेही निपुणता दाखवत ५० टक्केची शिषवृत्ती पटकवली व अथक परिश्रम घेऊन नागपूर गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेममध्ये एमबीबीएस चांगल्या मार्कने उत्तीर्ण होऊन भारतातीलच नव्हे तर जगप्रसिद्ध केईएम हॉस्पीटल मध्ये औपर्थलमॉलॉजीस्टला ला ऍडमिशन मिळवली. ती सध्या रुग्णांची सेवा



करत असल्याने ती ह्या सोहळ्यात सामील होऊ शकली नाही. डॉ मृणाल निकमला पुढील यशस्वी वाटचाली करता खुप खुप शुभेच्छा व आशिर्वाद. प्रसंगी डॉ मृणाल निकम च्या आई सौ सुनिता मदन निकम यानी गजरत्न पुरस्काराची रक्कम १० हजार रुपयांचा धनादेश स्वीकारला. याप्रसंगी सलाबादाप्रमाने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते राजनकर परिवारासह श्री बोधेकर परिवार, धोटे परिवार, निकम परिवार, गुप्ता परिवार,देशमुख परिवार व अनेक भाविकांनी ह्या कार्यक्रमाचे उत्सफूर्तपणे नियोजन केले.

# वर्डडी ग्रामपंचायतच्या सरपंच यांच्या मनमानी विरोधात आमरण उपोषण...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

वर्डडी ग्रामपंचायत चे सरपंच पती यांनी ग्रामपंचायतीमध्ये हस्तक्षेप करत असल्याप्रकरणी त्यांच्या वर कार्यवाही करण्यात यावी विरोधी पार्टी चे आहात म्हणून ग्रामपंचायत सदस्य सह नागरिकांना वेठीस धरून कुठलेच काम न होऊ देणे दादागिरी करणे , सरपंच व सरपंचपती यांचे वर कारवाई करण्यात यावी, १४ व्या वित्त आयोगाचे कामे मनमानी पद्धतीने ग्रामसभा न घेता जनतेचे हित न बघता दुसरीकडेच करणार अशी उद्धट भाषा वापरून निधी तसाच पडू देणे. ग्रामस्थांना वेळेवर कुठलाच गाव नमुना ८ आ न देणे, घरकुल शेड गोठा शौचालयाचा दाखला घरपट्टी पाणी पट्टी ,साठी,वारंवार नागरिकांना चकरा मारायला लावणे, व तरीही कुठलीच पावती न देणे निधी तसेच पडू देणे ग्रामस्थांना वेळेवर कुठलीच पावती न देणे, ग्रामपंचायत सदस्य यांचे घरकुल प्रस्तावावर फोटो असेल की सरपंच नागरिकांना घरकुलाच्या सभेचे फोटो विरोधी पार्टी सदस्य का घेतली म्हणून माझा फोटो असला तरच




तुमची फाईल मंजूर होईल अनेक समस्यासाठी सरपंच यांच्यावरती कायदेशीर कारवाई करण्यात यावी घरकुल बांधकाम ७/१२ वर करण्यात यावें पाणी आदी मागण्यासाठी सिंदखेड राजा पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषनास सुरुवात केली आहे यामधे ग्रामपंचायत सदस्य यांच्या सह नागरिकांनी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषणास प्रारंभ केला आहे या उपोषण मधे राधेराव देविदास सोनकांबळे ,सोनाली सोनकांबळे, जगन्नाथ दशरथ आटोळे ,त्र्यंबक अरुण आटोळे, आदींनी उपोषण सुरू करण्यात आला आहे या उपोषणास वंचित नेते भाई दिलीप खरात माजी आमदार तोताराम कायंदे, माजी आमदार डॉ शशिकांत खेडेकर,भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ गणेश मांटे, वंचित चे तालुकाध्यक्ष मधुकर शिंदे आदींनी भेट दिली

# वृद्ध साहित्यिक, कलावंतांनी माहिती सादर करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलडाणा**

वृद्ध साहित्यिक, कलावंतांना मानधन योजनेंतर्गत मानधन देण्यात येते. यासाठी लाभार्थ्यांच्या संपूर्ण माहितीचे अद्ययावतीकरण करण्यात येत आहे. यासाठी आवश्यक असलेली माहिती पंचायत समिती कार्यालयात सादर करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील वृद्ध साहित्यिक, कलावंतांना मानधन योजनेंतर्गत लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांची परिपूर्ण माहिती यात आधार कार्ड, पॅनकार्ड, मोबाईल क्रमांक, अद्ययावत करणे



गरजेचे आहे. त्यानुसार जिल्ह्यातील वृद्ध साहित्यिक आणि कलावंत मानधन योजनेंतर्गत मानधन घेत असलेल्या कलावंतांनी आधार कार्ड, पॅनकार्ड, मोबाईल नंबर, ह्यातीचे दाखले यांची छायांकित प्रत गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना दि. ५ मार्च २०२४ पर्यंत दुपारी १ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी मनोज मेरत यांनी केले आहे.

# प्राथमिक आरोग्य केंद्र अंत्री खेडेकर येथे ९१ टक्के पल्स पोलिओ मोहीम यशस्वी...

**जनसंचलन/ चिखली**

चिखली तालुक्यातील मौजे अंत्रीखेडेकर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथील डॉक्टर ठाकरे मॅडम यांच्या प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी व उपकेंद्र येथे कॅम्प लावून प्रत्येक पाच वर्षाखाली बाळाला पल्स पोलिओचा डोस देण्यात आला त्यामध्ये वाडी वस्तीत तांडा या ठिकाणी स्वतः डॉक्टर ठाकरे मॅडम यांनी जाऊन लहान बालकांना पोलिओ डोस दिला तसेच त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगितले त्यामुळे वाडी वस्तीवरील जे मुले शिक्षणापासून वंचित आहे त्यांना पॉलिओ विषय माहिती दिली आहे या पूर्वी सुद्धा पोलिओ विषयी जनजागृती करुन माहिती दिली आहे पोलिओ चे दुष्परिणाम काय असतात व घेतल्यामुळे काय होते या वर सविस्तर चर्चा करण्यात आली त्या वेळेस प्राथमिक आरोग्य केंद्राचे काही सहकारी हजर होते वाढी वस्तीवरील तसेच तांडा वस्तीवरील मुलानी पोलिओचा



डोस घेतल्यामुळेच ९१ टक्के ध्येय साधता करता आले अशी माहिती प्राथमिक आरोग्य केंद्र चे मेडिकल ऑफिसर डॉक्टर ठाकरे मॅडम यांनी माहिती दिली आहे जे लाभार्थी बाकी आहेत त्यांना लवकरच पुढील कार्यक्रमांमध्ये त्यांना पोलीओ देण्यात येईल उच्च प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर ठाकरे मॅडम यांचे नियोजन व त्या कार्यक्रमामुळेच हे ध्येय साध्य झाले त्यांच्यासोबत एक मोबाईल टीम व प्रत्येक कर्मचारी हा आपल्या बुधवार सक्रिय होता त्यांनी अंगणवाडी सेविका यांनी सुद्धा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांना मोलाचे सहकार्य केले आहे

# शेगाव ते समृद्धी महामार्गाच्या अन्यायग्रस्त शेतकऱ्यांच्या पूर्ण ताकतीनेशी उभी राहणार – सौ डॉ ज्योतीताई शिवशंकर खेडेकर

**जनसंचलन/ चिखली**

सध्याच्या घडील चर्चित असलेला भक्तिमार्ग हा सिंदखेडराजा ते शेगांव हा नवीन भक्ती महामार्ग होत असल्याची घोषणा राज्य सरकार कडून करण्यात आली आहे. मुंबई ते सिंदखेडराजा मार्गे शेगाव असा जलदगतीने प्रवास करता यावा यासाठी या महामार्गाची निर्मिती करण्यात येत असल्याचे सरकारकडून सांगण्यात येत आहे. हा महामार्ग ज्या शेतकऱ्यांच्या शेतातून जात आहे ते शेतकरी आपल्या जमिनी जात आहेत म्हणून कमालीचे चिंतेत आहेत. जेंव्हा पासून या महामार्गाची घोषणा झाली तेंव्हा पासून संबंधित शेतकऱ्यांचे फोन



मला येत होते.त्यापैकी करतवाडी येथील शेतकऱ्यांची भेट घेतली व त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. शेतकऱ्यांच्या शेतजमिनी जात असल्यामुळे या भक्ति महामार्गास शेतकऱ्यांचा तीव्र विरोध आहे. या महामार्गा मध्ये बऱ्याच छोट्या शेतकऱ्यांची सर्व जमीन जात आहे. त्यामुळे ते भूमिहीन होत आहे, त्यामुळे माझाही या भक्ति महामार्गाला विरोध आहे.

# जात वैधता प्रमाणपत्रासाठी ११ मार्चपर्यंत विशेष मोहिम

**जनसंचलन/बुलडाणा**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक प्रमाणपत्र अभियानातंर्गत जात वैधता प्रमाणपत्रासाठी विशेष मोहिम शिबिर उपक्रम राबविण्यात येत आहे. ही मोहीम ११ मार्चपर्यंत सुरू राहणार आहे. जिल्ह्यात आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक अभियानातर्गत जात प्रमाणपत्र पडताळणीच्या प्रकरणांमधील त्रृटी पुर्ततेसाठी विशेष मोहिम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत अर्जदारांचे शैक्षणिक, सेवा, निवडणूकीसाठी जात वैधता प्रस्ताव पडताळणीसाठी घेतले जाणार आहे. सादर केलेल्या सर्व जाती दावा प्रकरणांमध्ये समितीस्तरावर प्राथमिक छाननी करुन ज्या प्रकरणामध्ये कागदपत्रे, पुरावे अभावी त्रृटी आहे. अशा प्रकरणांमध्ये जाती दावा प्रस्तावात नमूद मोबाईलवर एसएमएसद्वारे, ई-मेल, लेखी पत्रान्वये त्रृटी कळविण्यात आली आहे. यात अर्जदारांनी त्रृटी पुर्तता केली नसल्यास अशा शैक्षणिक, सेवा, निवडणूक प्रस्तावातील अर्जदारांनी दि. ११ मार्चपर्यंत विशेष त्रृटी पूर्तता मोहिमेचा लाभ घ्यावा, त्रृटी पुर्तता करुन प्रकरण निकाली काढून घ्यावे, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य सचिव तथा संशोधन अधिकारी मनोज मेरत यांनी केले आहे.

# लोकसभेच्या २२ जागांसाठी आग्रही, शिंदेंच्या विश्वासू शिलेदारांचा दावा, महायुतीतील तिढा सुटणार की वाढणार?

**वृत्तसंस्था/मुंबई**

भाजपने लोकसभेच्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. पण, त्यामध्ये महाराष्ट्रातील एकही उमेदवाराचं नाव नव्हतं. त्यावरुन असं दिसून येतं की राज्यातील महायुतीमधील भाजप, शिंदे गट आणि अजित पवार गट यांच्यातील जागावाटपाचा पेच अद्याप सुटलेला नाही. याचदरम्यान आता शिवसेना शिंदे गटाने महाराष्ट्रात लोकसभेच्या २२ जागा मागितल्याचं समोर आलं आहे. शिंदे गटाचे मंत्री शंभुराज देसाई यांनी सांगितलं की, शिव-सेनेने २०१९ च्या निवडणुकांमध्ये धनुष्यबाणाच्या चिन्हावर २२ जागांवरुन निवडणूक लढवली होती. या निवडणुकीतही आमची तेवढ्याच जागांची मागणी आहे.लोकसभा २०२४ निवडणुकी हा महायुतीमधील भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट एकत्रच लढतील हे तर निश्चित आहे. कुठला पक्ष किती जागांवर आणि कोणता पक्ष कोणत्या मतदारसंघातून निवडणूक लढवेल यावर अद्याप निर्णय बाकी आहे. याविषयी प्रत्येक पक्षाच्या बैठका पार पडल्या आहेत आणि त्याचा अहवालही सादर करण्यात आला आहे. शिवसेना शिंदे गटाने दिलेल्या माहितीनुसार, त्या सर्व २२ लोकसभा मतदार संघांचा आढावा घेण्यात आला असून त्याचा अहवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आला आहे. आता अंतिम निर्णय हा त्यांचा असेल.शिंदे गटाने दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी २०१९ मध्ये २२ जागांवरुन निवडणूक लढवली होती आणि त्यापैकी १८ जागा त्यांनी मिळवल्या होत्या. त्यामुळे यंदाही २२ जागा मिळवण्यासाठी ते आग्रही आहेत. लवकर याबाबत तिन्ही पक्ष मिळून निर्णय घेतील. महायुती सरकारमधील वातावरण चांगलं असून कोणीही नाराज नाही,



असंही शिंदे गटाने स्पष्ट केलं. जागावाटपाबाबत बैठकीत चर्चा केली जाईल आणि योग्य तो मार्ग काढला जाईल. कोणीही नाराज होणार नाही, असंही त्यांनी सांगितलं.महाराष्ट्रात भाजप आपल्या सोबतच्या पक्षांना जागा देईल पण एका अटीवर की त्यांनी निवडणूक कमळ चिन्हावर लढवावी, अशी चर्चा सुरु आहे. ५ मार्चला गृहमंत्री अमित शाह हे महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. महाराष्ट्र लोकसभेच्या जागावाटपाच्या मुद्द्यावरुन त्यांचा हा दौरा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. यावेळी अमित शाह हे जागावाटपाचा तिढा सोडवण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# देह व्यापाराच्या नावाखाली युवकाची केली लाखों रूपयांनी फसवणूक...

## गुजरातमधील पाच जणांना १० दिवसांची पोलिस कोठडी

**जनसंचलन/बुलढाणा**

वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या बुलढाण्यातील एका युवकाची देह व्यापाराच्या नावाखाली ५ लाख ४० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी सायबर पोलिसांनी गुजराथमधील अहमदाबाद येथील पाच जणांना राजस्थानच्या मंडाना येथून ताब्यात घेतले आहे. दरम्यान पाचही आरोपींना ३ मार्च रोजी बुलढाणा न्यायालयाने १० दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये दिवान जैनुल आबेदीन (२०), फुझेल खान रशिद खान पठाण (२२), जीत संजयभाई रामानुज (२५), मुस्तफा खान मोहम्मद खान पठाण (२६, रा. अहमदाबाद, गुजरात) आणि चिरागकुमार कोडाभाई पटेल (३०, रा. मोरैया, अहमादाबाद, गुजरात) यांचा समावेश असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक सनील कडासने यांनी ४ मार्च रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये केली. यावेळी अपर पोलिस अधीक्षक बी. बी. महामुनी उपस्थित होते. दरम्यान या प्रकरणात मोठे रॅकेट असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यादृष्टीने पोलिस आरोपींची पोलिस कोठडीदरम्यान



चौकशी करणार असल्याचेही ते म्हणाले. बुलढाण्यात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या एकाने २४ डिसेंबर २०२३ रोजी सायबर पोलिस ठाण्यात कॉल गर्ल पुरविण्याच्या नावाखाली आपली ५ लाख ४० हजार रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार दिली होती. ऑनलाइन सर्च करताना मिळालेल्या एका मोबाइल क्रमांकावर फोन करून विचारणा केली असता सर्व्हिस पुरविण्यात येईल, असे सांगून वेगवेगळ्या चार्जेस करीता वेगवेगळ्या बँक खात्यावर पैसे मागवून घेत ही फसवणूक करण्यात आली होती. दरम्यान या प्रकरणात सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रल्हाद काटकर यांनी गुन्ह्याच्या तपासात आरोपींनी वापरलेले वेगवेगळी बँक खाती, मोबाइल नंबर, सीसीटीव्ही फुटेज व आरोपींचे मोबाइलवरून लोकेशन काढले. पोलिस अमलदार शकील खान, राजदीप वानखडे, विकी खरात, केशव घुबे, संदीप राऊत, ऋषीकेश खंडेराव यांनी त्यानंतर आरोपींना ताब्यात घेतले.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |


ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ७.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.५०% | ७.५०% |
| ३ | १८१ दिवस ते १६ महिने | | ८.००% | ८.००% |
| ४ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ७.००% |
| ५ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ६ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | – |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |
| ७ | सुकन्या लक्षाधिश ठेव योजना | | ८.७०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर ०.२५% टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

वित्तं देहि गुणान्वितेषु ।

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४–२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००–३१३–२३२४